Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## :: परिपत्रक ::

**विषय :** प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्याकरिताच्या कार्यवाहीबाबत...

प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षेचे अर्ज विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता त्यांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांनी संगणक प्रणालीमधील त्यांच्या लॉगिनमध्ये परीक्षा अर्ज भरुन लॉगिनमधून विहीत शुल्क भरल्यानंतर परीक्षा अर्ज ऑटोअ‍ॅप्रुव्ह होत असल्याने विद्यापीठ अधिविभागांना विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज व इतर कागदपत्रे याबाबत पडताळणी करणे अशक्य होत आहे. उदा. प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षेकरिता एखाद्या विद्यार्थ्याने परीक्षा अर्ज भरून त्याकरिताचे आवश्यक शुल्कही त्याच्या लॉगिनमधून आदा केले. तथापि, सदर विद्यार्थ्याने सैध्दांतिक परीक्षेकरिता आवश्यक कोर्सवर्क केलेले नाही. लॉगिनमध्ये परीक्षा अर्ज परस्पर अ‍ॅप्रुव्हल होत असल्याने विद्यार्थ्यांच्या कोर्सवर्क पूर्ततेबाबत विद्यापीठ अधिविभागास पडताळणी करणे शक्य होत नाही.

तसेच शुल्क जमा केलेले असल्याने परीक्षा अर्ज रद्दही करता येत नाही. यामुळे एखादा विद्यार्थी कोर्सवर्क पूर्ण न करता परीक्षेकरिता प्रविष्ठ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरिता अधिविभागांनी कोर्सवर्क पूर्ण झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना तसे प्रमाणपत्र न चुकता देण्याची व्यवस्था करावी. कोर्सवर्क प्रमाणपत्रामध्ये अधिविभागाचे नांव, विद्यार्थ्याचे नांव, कोर्सवर्क कोणत्या दिनांकापासून सुरू होऊन कधी समाप्त झाले आहे याचा विशेष उल्लेख करून मा. अधिविभागप्रमुख व मा. समन्वयक यांच्या स्वाक्षरीने देण्यात यावे व त्याची कार्यालयीन प्रत अधिविभागाच्या दप्तरी ठेवण्यात यावी.

संशोधक विद्यार्थी रिसर्च अ‍ॅण्ड पब्लिकेशन परीक्षा उत्तीर्ण झाला असल्यासच सैध्दांतिक परीक्षेचे अर्ज संशोधक विद्यार्थ्याच्या लॉगिनमध्ये उपलब्ध होतील. संबंधित विद्यार्थ्याने कोर्सवर्क पूर्ण केले आहे किंवा नाही याबाबतची खातरजमा झाल्यानंतर सदरचा अर्ज अधिविभागाने शुल्क भरण्याकरिता विद्यार्थ्याकडे मार्क करावा व त्यानंतर सदरचा अर्ज विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये शुल्क भरण्याकरिता उपलब्ध होईल आणि विद्यार्थ्याने लॉगिनमधून शुल्क भरल्यानंतर सदरचा अर्ज ऑटोअ‍ॅप्रुव्ह होईल.

सैध्दांतिक परीक्षेचे अर्ज भरताना उपरोक्तप्रमाणे कार्यवाही अवलंबिली जाईल. परीक्षा अर्ज भरल्यानंतर अधिविभागाकडून मुखपत्रासह स्वतंत्र कागदावर सर्व विद्यार्थ्यांची नांवे, कायम नोंदणी क्रमांक, परीक्षा शुल्क भरलेली रक्कम, व दिनांकासह पावती क्रमांक, वैयक्तिक भरलेली रक्कम व एकूण रक्कम इत्यादि माहिती नमूद करून अ‍ॅप्रुव्हड् परीक्षा अर्जांची चेक लिस्ट सादर करावी.

बीएस्सी-एमएस्सी परीक्षा विभाग/१८८
दि. २७.०१.२०२६

डॉ. अजितसिंह जाधव
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत,
मा. अधिविभागप्रमुख/मा.समन्वयक,
संबंधित सर्व अधिविभाग/संशोधन केंद्रे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

इंटरनेट सेल : विद्यापीठ संकेतस्थळावर Exam Circular येथे प्रकाशित करावे. (प्रसारण कालावधी - सदरचे परिपत्रक वारंवार निदर्शनास येणे अपेक्षित असल्याने कायमस्वरूपी)